# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१०६८**

**अपिलार्थी श्री. विजय सांगा शियाळ**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून सक्षम प्राधिकारी-२, (टे-४)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
३ रा मजला, ए-विंग, प्रशासकीय इमारत,
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार सक्षम प्राधिकारी-२ (टे-४)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
रूम क्र..३०२, ३ रा मजला, ए-विंग, प्रशासकीय इमारत,
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०८.२०२५</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१०.२०२३ | १७.११.२०२३ | २६.१२.२०२३ | ०२.०२.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १८.०४.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतरही माहिती दिली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १७.११.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०२.०२.२०२४ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २०.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार मौजे जूहू, ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर, के/ पश्चिम, जुहू रोड, सर्वे क्र. ७१, न.भू.क्र. १०४९ (१०४९-अ) येथील बृहन्मुंबईसाठी झोपडीधारकांचे ओळखपत्र सर्वेक्षण- २००० संबंधीत ३ मुद्यांची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.११.२०२३ रोजी अपिलार्थींना कळविले की, माहिती अर्जातील माहितीबाबत या कार्यालयाचे दि. १८.०४.२०२३ जा.क्र. १४०० रोजीचे पत्राने कळविण्यात आले होते. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २६.१२.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०२.०२.२०२४ रोजी अर्जदार यांचे अपील अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीचा पुन्हा शोध घेऊन माहिती उपलब्ध झाल्यास अपिलार्थीस पुरविण्यात यावी असे आदेशित केले.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थी यांनी न.भू.क्र. १०४९ (१०४९-अ) येथील बृहन्मुंबईसाठी झोपडीधारकांचे ओळखपत्र सर्वेक्षण- २००० अंतर्गत भरलेले गणनापत्रकाची माहिती विचारली होती. जे की, विस्तृत स्वरुपाची व त्रयस्थ पक्षाची माहिती आहे. महाराष्ट्र शासनाच्या धोरणाप्रमाणे त्यांच्याकडे संगणकीय अभिलेखामध्ये उपलब्ध गणनापत्रकाची माहिती माहितीचा अधिकार अंतर्गत संबंधीत अपिलार्थींना नियमाप्रमाणे तपासून देता येते.

अपिलार्थींना संपूर्ण झोपडीधारकाचे ओळखपत्र सर्व्हेक्षणाची माहिती देता येत नाही. अपिलार्थी यांनी विशिष्ट गणनापत्र अनुक्रमांक नमुद करुन माहिती अर्ज सादर करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ११.०८.२०२५**